## साध्वी

(मर्ढेकरांची व निष्पाप मुंग्यांचीही माफी मागून वगैरे)

तू एक साध्वी, ती एक साध्वी,
हा एक साध्वी, तो एक साध्वी,
ही एक साध्वी, ती एक साध्वी,
काही फटकळ, काही निनावी;

सहस्र जमल्या, लक्ष, कोटिही,
अब्ज अब्ज अन् निखर्व साध्व्या;
अनंत अगणित साऱ्या जमल्या-
किती विखारी, किती लफंग्या!

कुणी क्रूर अन् हिंसक काळ्या;
कुणी तांबड्या, भगव्या गोऱ्या;
कुणी उतावीळ लोकलसभेच्या
बेडर भोपाळात लवंग्या!

सावधान कुणी बॉम्ब पेरूनी
एकामागून एक चालती;
कुणी बावळ्या अप्पलपोट्या
उमेदवारीसाठी झुरती;

व्रतस्थ बनती स्फोट घडवूनीं
चावा काढीत, झोडीत इतरां
जन्म कंठती; तुरुंगात कुणी
कारस्थानी लबाड चतुरा!

-आला आला स्वस्त दरावर आला
हो आला, हा साधुंचा लोंढा आला खोला,
फाटक खोला!-

लोकलसभा ही एकोणवीसाची
सोडीत आली पोकळ श्वास;
फाजील, साधू, चोरांचा अन्
सौदा पटला जहरी खास.

हे नच साधू: हीच राक्षसें
असेच होते नथुरामजी,
मंबाजी अन् हेमाद्री पण
आणिक त्यांचे गुर्रगुर्र गुर्जी.

मेंदूंवरती भिनलेले किती
पुरातनींचे जहाल धर्म;
जात-धर्माची होऊनी कॉकटेल
दहशतवादी जालिम कर्म.

जसे पाप्याचे शस्त्र फिरावे
निरागसाच्या गळ्यावरूनी,
ह्या साऱ्यांची भेकड वृत्ती
वावरते तशी जगण्यामधूनी.

ह्या नच साध्व्या: हींच दानवें:
घेती हौतात्म्याचे पाप;
उलट्या बोंबा मारीत देती
कालबाह्य कुचकामी श्राप!

**रेणुकादास उबाळे**
तुमसर, जि. भंडारा
renukadas1983@gmail.com

१ ते १५ मे २०१९